**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-२०२/२०२१**

**अपिलार्थी, श्री. भास्कर लडकू दळवी**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (माध्यमिक),**
जिल्हा परिषद पालघर, मुख्य प्रशासकीय इमारत, नवली,
ता.जि.पालघर ४०१४०४

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद पालघर, मुख्य प्रशासकीय इमारत, नवली,
ता.जि.पालघर ४०१४०४

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.५.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| **२५.९.२०२०** | ----- | **१४.१२.२०२०** | ----- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.२१.१.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी आणि श्री. आर.एस.पाटील, मुख्याध्यापक, दि. वाडा एज्युकेशन सोसा. वाडा हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले की, त्यांच्या दिनांक २५.९.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये, "*दि. वाडा एज्युकेशन सोसायटीच्या या संस्थेच्या शाळांच्या शिक्षक, कर्मचारी रोस्टर बिंदु नामावली तसेच इतर नोकर भरती प्रक्रीयेबाबत.*" अशा प्रकारची माहिती मागीतली होती. सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरून उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येत नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस सदरची उपलब्ध माहिती दि. वाडा एज्युकेशन सोसायटी या संस्थेकडून प्राप्त करून पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (माध्य), जिल्हा परिषद पालघर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरून सदरची उपलब्ध माहिती दि.वाडा एज्युकेशन सोसायटी या संस्थेकडून प्राप्त करून **अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मे, २०२२

(सुनील पोरवाल)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**